# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

विद्यापीठातील सर्व शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी व विद्यार्थीनी यांना कळविण्यात येते की, बुधवार दि. १२/०१/२०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वामी विवेकानंद जयंती कार्यक्रमानिमित्त विद्यापीठाच्या मुख्य इमारतीमधील पोर्चमध्ये स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस मा. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या शुभहस्ते मा. प्र–कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील व मा. प्र. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या उपस्थितीत पुष्पहार अर्पण करण्याचा समारंभ आयोजित करण्यात आला आहे. तरी विद्यापीठातील सर्व शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी व विद्यार्थीनी यांनी कोव्हिड १९ नियमांचे पालन करून या कार्यक्रमास उपस्थित रहावे.

जा. क्र. रसायनशास्त्र/०९
दि. ०७/०१/२०२२

अधिविभागप्रमुख
रसायनशास्त्र अधिविभाग

प्रती–

१. सर्व अधिविभाग/प्रशासकीय विभाग प्रमुख यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी व माहितीसाठी
२. स्वीय सहाय्यक – मा. कुलगुरू/ प्र–कुलगुरू/ कुलसचिव/ वित्त व लेखा अधिकारी/संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांना माहितीसाठी
३. सर्व उपकुलसचिव, सहा.कुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी
४. सर्व रेक्टर यांना सदरचे परिपत्रक वसतिगृहातील नोटीस बोर्डवर लावणेची व्यवस्था करावी.
५. अभियांत्रिकी विभागाने कार्यक्रमाच्या ठिकाणी स्वच्छता व इतर व्यवस्था करावी.
६. उद्यान विभागाने कार्यक्रमाच्या ठिकाणी कुंडया ठेवण्यात याव्यात.
७. जमादार यांनी कार्यक्रमाच्या ठिकाणी आवश्यक टेबल, स्टूल उपलब्ध करून द्यावे व कार्यक्रमाच्या वेळी मदतीस एक शिपाई द्यावा.
८. सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी व विद्यार्थीनी यांच्या निदर्शनास आणावे.
९. इंटरनेट विभागाने सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी ठेवावे.